दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक २९१ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.१५ जानेवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# आ.बाळाराम पाटील यांनी अधिकाऱ्यांची घेतली झाडाझडती

## जबाबदारी झटकणाऱ्या अधिकाऱ्यांवर करणार कारवाई

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

कोकण प्रांत शिक्षक मतदार संघाचे दक्ष शिक्षक आ.बाळाराम पाटील यांनी रायगड जिल्ह्यातील तालुका निहाय संपुर्ण मतदार संघातील विविध प्रलंबित कामाला आढावा घेण्यासाठी शिक्षक संवाद करीत पूर्ण रायगड जिल्ह्याचा संस्था, विद्यालय, शाळा व शिक्षक शिक्षकेत्तर बांधवांच्या समस्या आदी अडचणी जाणून घेण्यासाठी झंझावाती दौरा आयोजित केला होता. या वेळी रायगड जिल्हा परिषद अलिबाग येथील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या कार्यालयात सभापती निलीमा पाटील, उपाध्यक्ष तथा शिक्षण सभापतीचे सचिव, शिक्षणाधिकारी, वेतन अधीक्षक आणि सर्व शिक्षण विभागातील कर्मचारी यांची एकत्रित बैठक घेऊन कामचुकार करणाऱ्या अधिकाऱ्यांची झाडाझडती घेतली व जिल्ह्यातील शैक्षणिक संस्थांच्या प्रलंबित कामाला त्वरित निपटारा करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच कामचुकार करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर ही कारवाई करण्याची मागणी यावेळी शिक्षक आमदार बाळाराम पाटील यांनी केली आहे.



शिक्षक आमदार बाळाराम पाटील यांनी साधलेल्या शिक्षक संवादामध्ये अधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी शिक्षण विभागातील अधिकारी वेतन पथकातील अधिकारी यांचे बाबत समन्वय साधून विविध विषयांवर ती चर्चा केली व त्यामधून त्वरित शिक्षक कर्मचारी व शाळांना दिलासा देण्याची मागणी केली. यामध्ये प्रामुख्याने, पीएफ सन २०१४ पासून पीएफच्या स्लिपा खातेदारांना मिळाल्या नाहीत. पर्यवेक्षक, उपमुख्याध्यापक, मुख्याध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मान्यता वेळत दिल्या जात नाहीत. जिल्हा बदली मान्यता प्रलंबित आहेत.

२ वर्ष वरिष्ठ वेतन श्रेणी व २४ वर्षे निवड श्रेणी मंजूर प्रस्ताव प्रलंबित आहेत. संच मान्यता दुरुस्ती प्रस्ताव प्रलंबित आहेत. सातवा वेतन आयोग पहिला हप्ता, सेवानिवृत्त शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचारी यांना अद्याप मिळालेला नाही. रजा रोखीकरण बिले प्रलंबित आहेत. बी.डी.एस चालू नाही. ४०% अनुदानाची फरक बिले प्रलंबित आहेत. पुरवणी बिले व वैद्यकीय बिले प्रलंबित आहेत. RTE मान्यता प्रलंबित आहेत. (तीन वर्षासाठी मान्यता), आर टी ई प्रवेश परताव्याचे अनुदान प्रलंबित आ-हेत. सेवानिवृत्तीची पेन्शन प्रकरणे दोन वर्षापासून प्रलंबित आहेत.

विनाअनुदानित मान्यता प्राप्त शिक्षकांना अनुदान तत्त्वावरील तुकडी मान्यता मिळत नाही. पायाभूत तुकड्यां वरील शिक्षकांची मान्यता प्रलंबित आहेत. शिक्षणाधिकारी व मुख्याध्यापक यांची समस्या निवारण सभा होत नाही. विद्यार्थी नावात, जन्मतारीख, जात बदलचे प्रस्ताव प्रलंबित राहतात. न्यायालयीन प्रकरणातील मान्यता प्रलंबित आहेत. दहावी-बारावी संकेतांक मान्यता पुर्नमान्यता वर्ष वर्ष दिले जात नाहीत. पर्यायी दंड भरावा लागतो, सुनावण्यांसाठी वारंवार बोलावून वेळेत निपटारा केला जात नाही या मूलभूत समस्यांचा समावेश होता या वेळी उपस्थित सर्व अधिकाऱ्यांची कानउघाडणी करून सर्व प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याचे आदेश दिले आहे.

> रायगड जिल्ह्यातील विविध शिक्षण संस्था व शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना आव्हान आहे की जर आपणास कोणत्याही कार्यालयीन प्रकारची अडचण असेल तर आपण कुठल्याही प्रकारची लाच न देता कायदेशीर मार्गाचा अवलंब केला पाहीजे. आपले काम उशिरा झाले तरी चालेल पण आपण कुठल्याही प्रकारची लाच देऊ नये. कुठल्याही प्रकारच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी मी वेळोवेळी आपल्या पाठीशी उभा आहे. जर कोणताही अधिकारी आपली जबाबदारी वेळेत पूर्ण करण्यासाठी असक्षम असेल तर त्याच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.
>
> **बाळाराम पाटील,**
> **कोकण शिक्षक आमदार**

## डॉ.गिरीश गुणे यांना पितृशोक

# डॉ.गोविंद रंगनाथ गुणे यांचे वृद्धापकाळाने निधन

**दै.रायगड नगरी । पनवेल**



डॉक्टर गोविंद रंगनाथ गुणे यांचे शुक्रवार दिनांक १३ जानेवारी रोजी सायंकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ८९ वर्षे होते. कोरोना निर्बंध असल्याने अगदी मोजक्याच आप्तेष्टांच्या उपस्थितीत उत्तर रात्री अमरधाम स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार पार पडले.

डॉक्टर गोविंद रंगनाथ गुणे यांचा देव माणूस म्हणून उल्लेख करणे कदाचित तितके पुरेसे होणार नाही. मनुष्याला देव माणूस बनण्याचे कसब शिकविणारे देव माणूस! असाच त्यांचा उल्लेख करावयास हवा.कारण त्यांच्याच संस्कारात घडलेले डॉक्टर गिरीश गुणे आज जनसेवेचा वसा तितक्याच नेटाने सांभाळत आहेत.रुग्णसेवा हा व्यवसाय नसून ती मनुष्य सेवा आहे हा विचार डॉ. गोविंद गुणे यांनी रुजविला.तोच संस्कार त्यांनी चिरंजीव डॉ गिरीश गुणे यांना देखील दिला. म्हणूनच डॉ. गोविंद गुणे आणि डॉ.गिरीश गुणे यांना आज गरीब रुग्णांचे देव म्हणून संबोधले जाते.

डॉ. गोविंद गुणे यांचा जन्म २९ सप्टेंबर १९३३ रोजी पंढरपूर येथे झाला. मुंबई मधून वैद्यकीय शिक्षण पूर्ण करत त्यांनी ऊ-ङऋ पदवी प्राप्त केली. त्यानंतर तब्बल ५६ वर्षे त्यांनी रुग्ण सेवेसाठी स्वतःला वाहून घेतले. पनवेलच्या टपाल नाका येथे शनी मंदिरासमोर त्यांचे स्वतः चे क्लिनिक होते. तब्बल ३५ वर्षे त्यांनी या क्लिनिकच्या माध्यमातून गरीब गरजू रुग्णांची सेवा केली. अत्यल्प शुल्क ते सुद्धा असल्यास द्यावे,अशा वृत्तीने ते जनसेवा करायचे.

रुग्णसेवेचे सोबतच रोटरी क्लबच्या माध्यमातून त्यांनी समाजसेवा केली. ज्या समाजात आपण अर्थार्जन करतो त्या समाजाचे आपण ऋण फेडले पाहिजे या भूमिकेतून रोटरी क्लब च्या विविध उपक्रमांना ते भरभरून देणग्या देत असत. रायगड जिल्ह्यातील पहिले पी एच एफ डोनर (झर्रीश्र क्रीौळी षशश्रश्रे ीशलेसपळ-ींळेप) म्हणून त्यांनी सन्मान पटकाविला होता. पोलिओ निर्मूलनाच्या अभियानात या देणग्या अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असत. त्यानंतर डॉक्टर गोविंद गुणे यांनी अनेकदा देणग्या देत पी एच एफ डोनर म्हणून बहुमान पटकावला. २०१७ साली पनवेलच्या वि.खं. विद्यालयाच्या शतक महोत्सवी सोहळ्यात,ज्या शाळेने आपल्याला विद्या देऊन डॉक्टर घडविले,त्या आपल्या शाळेचे आपण काहीतरी देणं लागतो या भूमिकेतून डॉक्टर गोविंद गुणे आणि डॉक्टर गिरीश गुणे यांनी तब्बल पंचवीस लाख रुपयांची देणगी दिली.

डॉक्टर गोविंद गुणे हे रायगड मेडिकल असोसिएशनचे आजीव सभासद होते. आज दिमाखात उभ्या असलेल्या आणि रुग्ण सेवेमध्ये अखंडपणे वाहून घेतलेल्या गुणे हॉस्पिटलचे ते संस्थापक होय.सध्याच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या समोर डॉक्टर गुणे यांचा टुमदार बंगला आहे. कालांतराने त्याचा राहण्यासाठी वापर होत नसल्याने तो देखील समाजाच्या उपयोगी पडावा या हेतूने तो कधी पोलीस आयुक्त, कधी गरजवंत शाळा तर कधी रोटरीच्या उपक्रमांकरता डॉक्टर गुणे यांनी खुला करून दिला.

डॉ. गोविंद गुणे यांच्या पत्नी सौ गिता लॅब टेक्निशियन होत्या. सुरुवातीला त्या पनवेल रुग्णालय येथे लॅब टेक्निशियन म्हणून काम पाहत होत्या. त्यानंतर त्यांनी स्वतःची लॅब सुरू केली होती. एक वर्षापूर्वी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.डॉ.गोविंद गुणे यांच्या ८१ व्या वर्षी त्यांचा सहस्त्र चंद्र दर्शन सोहळा कुटुंबियांच्या वतीने साजरा करण्यात आला होता. डॉक्टर गोविंद यांना आकाशवाणीवरील संगीत ऐकण्यास आवडायचे.आकाशवाणीवर सकाळी प्रसारण होणाऱ्या अस्मिता या कार्यक्रमात ते नित्य नेमाने फर्माईशी कळवत.४० वर्षीय त्यांची फियाट ते आवडीने मेन्टेन करत आणि तितक्याच आवडीने तिच्या ड्रायव्हिंग चा आनंद घ्यायचे. निसर्गरम्य वातावरणात फिरायचे आणि निसर्गाचे फोटो काढायचे हा त्यांचा आवडीचा छंद होता. डॉ. गोविंद गुणे यांच्या निधनाचे वृत्त समजताच आमदार बाळाराम पाटील,शेकाप चे पनवेल विधानसभा मतदार संघाचे अध्यक्ष काशिनाथ पाटील, विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे, श्री साई देवस्थान वहाळ चे संस्थापक अध्यक्ष रवीशेठ पाटील, शेकाप पनवेल जिल्हा चिटणीस तथा नगरसेवक गणेश कडू, डॉ.नितीन म्हात्रे,डॉ. विजय सदाशिव भगत,डॉ. आमोद दिवेकर,डॉ. सी डी कुलकर्णी,सिटी बेल वृत्त समूहाचे समूह संपादक मंदार दोंदे, वि. खं. विद्यालयाच्या शाळा समितीचे सदस्य आनंद धुरी, युवा नेता बबन विश्वकर्मा, अविनाश मकास, संतोष घोडींदे, ऋषिकेश बुवा, प्रीतम कैय्या,विक्रम कैय्या आदी मान्यवरांनी त्यांच्या पार्थिवाचे दर्शन घेऊन,डॉ. गिरीश गुणे यांचे सांत्वन केले.

> रुग्णसेवेचा हा वसा कुठल्याही परिस्थितीमध्ये आम्ही सोडणार नसल्याने गुणे हॉस्पिटल अखंडपणे सुरूच राहील. तसेच कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढत असल्या कारणाने आपण निर्बंध पाळले पाहिजेत, त्यामुळे सांत्वनासाठी आमची व्यक्तिशः भेट घेणे टाळावे असे डॉ गिरीश गुणे यांनी समस्त जनतेला आवाहन केले आहे.

## संक्षिप्त...

### पाटी बदलण्याचा खर्च जास्त की दुकानाच्या काचा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील सर्व दुकाने, आस्थापनांच्या पाट्या मराठी भाषेत असाव्यात, या कायद्यातील पळवाटा आता बंद होणार आहेत. दहापेक्षा कमी कामगार असलेल्या दुकानांना मराठी पाट्या न लावण्याची आतापर्यंतची सूट आता कायद्यातील पळवाट म्हणून वापरता येणार नाही. यावर राज्य सरकारने दुकाने आणि आस्थापनावरील मराठी पाट्यांबाबत घेतलेल्या निर्णयावरुन व्यापारी वर्गातून विरोध होत आहे. फेडरेशन ऑफ रिटेल ट्रेडर्स वेल्फेअर असोसिएशननं दुकानदारांवर सक्ती करु नका अशी भूमिका घेतली आहे. दरम्यान, यानंतर मनसेनं इशारा दिला आहे. ज्या व्यापारांचा मराठी पाटीला विरोध आहे, त्यांना एकच प्रश्न आहे. पाटी बदलण्याचा खर्च जास्त आहे की दुकानाच्या काचा बदलण्याचा??, असा सवाल मनसे नेते संदीप देशपांडे यांनी केला आहे. देशपांडे यांनी ट्विटरच्या माध्यमातून इशारा दिला आहे.

राज्यातील सर्व दुकानांच्या पाट्या आता सरसकट मराठी भाषेत असतील. शिवाय, मराठी - देवनागरी लिपीतील अक्षरेही इंग्रजी किंवा अन्य भाषेपेक्षा लहान असणार नाहीत, अशी सुधारणा आता यासंदर्भातील कायद्यात केली जाणार असून या प्रस्तावाला बुधवारी राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. यासाठी महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाश-र्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे.

# मोरा येथे घराला आग ; पती-पत्नी किरकोळ भाजले

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण नगरपरिषद हद्दीतील मोरा कोळीवाडा, फड नं.१२ जवळ व उपनगराध्यक्ष जयविन कोळी यांच्या घरासमोरील, जगदीश हरी कोळी यांच्या घरातील घरगुती गॅस लिकेज मुळे घराला आग लागली असा प्राथमिक अंदाज आहे. घरातील पती व पत्नी हे किरकोळ भाजले. संपूर्ण घरातील सामान भस्मसात झाले असून सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही.

मोरा कोळीवाडा येथील घर नं.१०१८ या घरातील .../२



# कर्जतमध्ये भाजपला मोठा राजकीय धक्का

## कर्जत भाजपच्या दोन विद्यमान तालुका उपाध्यक्षांनी आपल्या सहकाऱ्यांसह केला शिवसेनेत जाहीर पक्षप्रवेश

**दै.रायगड नगरी । कर्जत**

महाराष्ट्र राज्यातील शिवसेनाप्रणीत महाविकास आघाडी सरकारच्या माध्यमातून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या सक्षम नेतृत्वाखाली संपूर्ण राज्यात विकासात्मक कामांना गती मिळाली आहे. त्यामुळे शिवसेनेचे सर्वेसर्वा तथा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व युवासेनाप्रमुख अदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून व स्थानिक कार्यसम्राट आमदार महेंद्र थोरवे यांच्या मार्गदर्शनाखाली कर्जत भाजपचे तालुका उपाध्यक्ष पंढरीनाथ पिंपरकर व गौतम मुंढे यांनी आपल्या असंख्य सहकार्यांसह शिव-सेनेत जाहीर पक्षप्रवेश केला आहे.



शिवतीर्थ पोसरी येथे आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते शिवसेनेचा भगवा झेंडा उंचावत पाथरज जिल्हा परिषद विभागातील भाजपचे तालुका उपाध्यक्ष पंढरीनाथ पिंपरकर व सावेळे जिल्हा परिषद विभागातील भाजपचे दुसरे तालुका उपाध्यक्ष गौतम मुंढे यांनी आपल्या असंख्य सहकार्यांसह शिवसेनेत जाहिर पक्षप्रवेश केला. त्याप्रसंगी उपजिल्हाप्रमुख भाई गायकर, विधानसभा संपर्कप्रमुख पंकज पाटील, तालुका संघटक शिवराम बदे, उपतालुकाप्रमुख दिलीप ताम्हाणे, नगरसेवक संकेत भासे, जिल्हा परिषद विभागप्रमुख योगेश दाभाडे, पंचायत समिती विभागप्रमुख संदेश सावंत, बाजीराव दळवी, रमेश मते, ज्ञानेश्वर भालिवडे, उत्तम शेळके, नितीन धुळे, भगवान घुडे, विजय घुडे, मंगेश सावंत, संतोष पिंपरकर, सोपान भालिवडे, नवनाथ कदम, रामदास घरत, महेश घुडे, संतोष घुडे .../२

# माजी शहर प्रमुख प्रदीप वर्तक शिवसेनेत

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील शिवसेनेचे माजी शहर प्रमुख प्रदीप वर्तक यांनी शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख तथा अलिबागचे आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वगृही शिवसेनेत प्रवेश करून शिवबंधन बांधले.



यावेळी प्रवेश सोहळ्या प्रसंगी शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख तथा अलिबागचे आमदार महेंद्र दळवी, माजी शहर प्रमुख प्रदीप वर्तक, पेण तालुका प्रमुख तुषार मानकावळे, माजी उपजिल्हा प्रमुख अनंत पाटील, सापोली सरपंच लहू पाटील, काळेश्री सरपंच संजय पाटील, माजी शहर प्रमुख अशोक वर्तक, रवींद्र पाटील, अशिष वर्तक, दिलीप पाटील, विजय केळकर, रमेश भिकावले, संदेश यादव, प्रसाद वर्तक, भाई गोरडे, सुभाष जाधव आदींसह पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ.महेंद्र दळवी म्हणाले की, पेण तालुक्यासह रायगड जिल्ह्यात शिवसेना पक्ष वाढत असून नवीन व जुन्या कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन एक दिलाने काम करून पक्ष संघटना वाढीसाठी प्रयत्न करावे. पेण हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे. पेणवर माझे विशेष प्रेम आहे. शिवसेनेला पुन्हा मागील दिवस यावेत, यासाठी सर्वच शिवसैनिकांनी मतभेद विसरून एकदिलाने कामाला लागा. आगामी पेण नगरपरिषदेवर आपले नगरसेवक निवडून देण्यासाठी विशेष प्रयत्न करावे असे सांगितले.

तर माजी शहर प्रमुख प्रदीप वर्तक म्हणाले की, मला पुन्हा शिवसेना पक्षात घेऊन जो विश्वास आपण .../२

# भिंतीवर काढण्याचे चित्र, नगर परिषदेने काढले बसण्याच्या पारावर ; नगरपरिषदेचा अजब कारभार

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

२०२२ स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे स्वच्छता सर्वेक्षण २०२२ हे अभियान देखील चालू आहे. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास खात्याकडून राज्यातील सर्व नगरपंचायती व नगरपरिषद यांना स्वच्छता सर्वेक्षण २०२२ व स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष या निमित्त काही सन्मानचिन्ह काढून त्याची जाहिरात करण्याचे आदेश पारित करण्यात आले आहेत.

श्रीवर्धन शहरातील एक रस्ता जो दिवेआगर कडे जातो व दुसरा रस्ता जीवना बंदर कडे जातो त्या ठिकाणी भलेमोठे पिंपळाचे झाड असून त्या पिंपळाच्या झाडाला गोल असे पार बांधलेले आहे. वाळवटी, दिवेआगर कडे जाणारे काही प्रवासी किंवा जीवनाबंदर कडे जाणारे प्रवासी या पारावर बसलेले असतात. या सन्मान चिन्हावरती तिरंग्यामध्ये असल्याप्रमाणे हिरवा, पांढरा, भगवा रंग आहे. त्याचप्रमाणे अशोक चक्र देखील काढण्यात आलेले आहे. सदर चित्र रंगवण्याचे काम चालू असताना श्रीवर्धन मधील पत्रकार संतोष चौकर यांनी त्या ठिकाणी जाऊन श्रीवर्धन नगरपरिषदेचे मुख्याधिकारी विराज लबडे यांच्या निदर्शनास सदर बाब आणून दिली होती.

सदरचे चित्र भिंतीवर काढण्यास कोणतीही हरकत नाही. परंतु बसण्याच्या जागी सदरचे चित्र काढल्यानंतर त्यावरती कोणी अनवधानाने बसल्यास त्या चिन्हाचा अवमान होण्याचे शक्यता नाकारता येत नाही. परंतु श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासनाने या पारावरती हे चित्र रंगवून पूर्ण केले आहे. आता याबाबत श्रीवर्धन मधील नागरिकांमधून उलटसुलट चर्चा सुरू आहेत. नगरपरिषदेने स्वच्छ सर्वेक्षणची जाहिरात गावात अनेक ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या भिंतींवर चित्र काढून जरूर करावी. पण बसण्याच्या पारावर अशा प्रकारची चित्र काढू नयेत अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

# पाट्या : लावणे आणि टाकणे

महाराष्ट्रातील सर्व छोट्या-मोठ्या दुकानांवर आणि आस्थापनांच्या बाहेर मराठीत पाट्या लावण्याचा नियम महाविकास आघाडीच्या सरकारने केला आहे. याआधी दहापेक्षा कमी कर्मचारी असणाऱ्या दुकानांना सूट होती. ती आता नसेल. तसेच, मराठी आणि इतर भाषांमधील अक्षरांचा आकार समान असावा लागेल. मराठी अक्षरे छोटी असून चालणार नाही. सरकारी परिपत्रकात मराठी, मराठी असे म्हटले असले तरी ते खरे 'देवनागरी लिपी' असे आहे. हजारो दुकाने, व्यवसायांची मूळ नावे परभाषिक, इंग्रजीच असतात. फक्त ती देवनागरी लिपीत लिहिली जातील. एखाद्या पाटीवर 'फ्रेश फ्रूट अॅवेलेबल' असे रोमन लिपीत असेल आणि नव्या नियमांनी 'फ्रेश फ्रूट मिळतील' असे लिहिले की झाले ते मराठी. राज्य सरकारने आपण मराठीसाठी काहीतरी करतो आहोत, हे दाखविण्यासाठी अत्यंत प्रतीकात्मक आणि मराठीचे भले झाल्याचा भास निर्माण करणारा आभासी निर्णय घेतला आहे. त्याचे स्वागत तरी काय करायचे? गेली अनेक वर्षे मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याचे घोंगडे केंद्रात भिजत पडले आहे. उठसूट केंद्राशी संघर्ष करणारे हे सरकार किंवा आधीचे केंद्राच्या प्रेमातले युतीचे सरकार या प्रश्नावर कधीही निकराला आले नाही. महाराष्ट्रासाठी उत्तम, जागतिक दर्जाचे मराठी विद्यापीठ का नाही? अखेर, मुंबईत मरीन ड्राइव्हवर जागा मिळालेले मराठी भाषा भवन नेमके कधी काम सुरू करणार आहे? राज्यातील मराठी शाळांचा घसरता टक्का नेमका कधी सावरणार आहे? इंग्रजी भाषा ज्ञान आणि रोजगार, नोकरी यांची लाखो पालकांच्या मनात बसलेली सांगड हळुवार हातांनी सोडवून मराठी मुले इंग्रजी आणि मायभाषा असलेल्या मराठीत सारखीच प्रवीण असतील, असा विडा कोण व कधी उचलणार आहे? त्यासाठी, शैक्षणिक धोरणाचे तोंड योग्य दिशेने वळवून त्याची वेगवान अंमलबजावणी कधी सुरू होणार आहे? स्वातंत्र्याआधीच 'पुणे विद्यापीठ' हे मराठी भाषेचे विद्यापीठ व्हावे, अशी संकल्पना ज्येष्ठ इतिहासकार दत्तो वामन पोतदार यांनी मांडली होती. पुढे ते त्याच विद्यापीठाचे कुलगुरूही झाले. मात्र, पुणे विद्यापीठ हे काही 'मराठी विद्यापीठ' म्हणून आजही ओळखले जात नाही. डॉ. अरुण निगवेकर यांनी तेथे कुलगुरू असताना अनेक पदव्युत्तर अभ्यासक्रम मराठीत आणण्याचा उपक्रम केला. पण या आघाडीवर तेथे किंवा इतरत्र पुढे काय झाले? महाराष्ट्र राज्य झाल्यापासून पहिली यशवंतरावांची, दुसरी शरद पवारांची, तिसरी उद्धव ठाकरे-अजित पवार यांची आणि चौथी आदित्य ठाकरे-पार्थ पवार आदींची अशा पिढ्या मोजल्या तर या चौथ्या पिढीतील किती राजकारणी तरुण-तरुणी मराठी शाळांमध्ये, मराठी माध्यमांमध्ये शिकले असतील? त्यांची मराठी संस्कृतीशी नेमकी काय नाळ जोडलेली आहे? महाराष्ट्रातले सर्व नेते, नोकरशहा, कलावंत, उद्योगपती, लेखक-पत्रकार यांच्यापैकी किती जणांची मुले आज मराठी माध्यमात शिकतात किंवा शिकली? त्यांचेच अनुकरण सारा समाज करणार ना? या छोट्या पण महत्त्वाच्या निर्णयातून 'पुढच्या पिढीचा ऐहिक अभ्युदय आणि उत्कर्ष, मातृभाषेचा त्याग केला तरच होणार आहे,' असा संदेश पालक स्वत:ला, मुलांना आणि समाजालाही देत असतात. ऐहिक उत्कर्ष आणि भाषिक अस्मिता यांच्यातला कृतक पण थेट संघर्ष असा उभा केल्यानंतर त्यात कोण जिंकणार, हे वेगळे सांगायला नको. गेल्या तीन पिढ्या क्रमाक्रमाने मराठी पालक या चक्रव्यूहात वाढत्या संख्येने फसत गेला आहे. सक्ती करून, भाषाप्रेमाची प्रवचने देऊन किंवा फुकट पुस्तके, दप्तरांची लालूच दाखवून ही निर्णयप्रक्रिया उलटी फिरणार किंवा थांबणार नाही. त्यासाठी, प्रत्येक पालकाच्या, विद्यार्थ्याच्या मनात मराठीचा अंगिकार केल्याने ऐहिक अभ्युदय होईल; नुकसान होणार नाही, असा साधार विश्वास निर्माण व्हायला हवा होता. हे काम धोरणकर्त्यांचे, सरकारचे असते. त्यासाठी व्यापक राजकीय दूरदृष्टी लागते. असा मराठीच्या अभ्युदयाबद्दलचा विश्वास पेरण्याचे काम यशवंतराव चव्हाण हे केंद्रात मंत्री म्हणून गेल्यानंतर कुणीही करू शकले नाही. त्याची कटू फळे आज आपण भोगतो आहोत. धनवान महापालिकांना 'आम्ही केंद्रीय मंडळांच्या (इंग्रजी माध्यमांच्या) शाळा चालवतो,' अशा आत्मघाती जाहिराती करून त्यात भूषण मानावे लागते आहे. गेल्या वर्षी ठाकरे सरकारच्या अर्थसंकल्पात मराठी भाषेकडे काणाडोळा झाल्याबद्दल शिवसेनेचे ज्येष्ठ नेते दिवाकर रावते यांनी विधान परिषदेत टाहो फोडला होता. 'मी मेल्यावर वरती बाळासाहेबांना काय उत्तर देऊ?' असा आकांत मांडून त्यांनी मराठीच्या अंगावरची लक्तरे सर्वांना दाखवली होती. मातृभाषेपासून तुटणे म्हणजे नाट्य, चित्र, साहित्य, खाद्यसंस्कृतीसकट आपल्या संस्कृतीच्या शेकडो वर्षांच्या चिवट, रसरशीत पारंब्या तोडून स्वत:ला निराधार अंतराळात फेकून देणे असते. याचे गंभीर आकलन व खंबीर उपाय न करता, केवळ मराठी पाट्या लावण्याच्या निर्णयाच्या पाट्या टाकायच्या असतील; तर मराठीचा उत्कर्ष कसा आणि कधी होणार?

# कामोठे येथे विद्युत उपकेंद्र सुरु करण्यासाठी महावितरण कार्यालयावर धडक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे शहरामधे अनेक ठिकाणी महावितरणने बसविलेल्या डी पी बॉक्स गंजलेल्या अणि तुटलेल्या स्थितीत आहेत. काही ठिकाणी डी पी बॉक्स उघड्या असुन त्यामधील विद्युतवहक तारा फुटपाथवर आलेल्या आहेत. त्यामूळे नागरिकांना येण्याजाण्यास अडथळा निर्माण होतो तसेच भविष्यात ह्या तारांमधून विद्युतप्रवाह लिक झाल्यास नागरिकांच्या जीवास धोका निर्माण होऊ शकतो. अनेक डी पी बॉक्स हे उघड्या असल्यामुळे त्यामधील स्विच अणि इतर विद्युत उपकरणांना लहान मुले स्पर्श करु शकतात त्यामूळे त्यांच्या जीवास धोका निर्माण होऊ शकतो. तरी या संदर्भात वीज वितरण कंपनीने लक्ष घालून दुरुस्ती काम करून देण्यासाठी कामोठे कॉलनी फोरम यांनी भिंगारी येथील कार्यकारी अभियंता कार्यालयात धडक मारुन याबाबत तक्रार केली आहे.



शहरातील अनेक ठिकाणी डी पी बॉक्स तसेच ट्रान्सफार्मरच्या आजुबाजुला मोठ्या प्रमाणात झाडी झुडपे अणि गवत वाढले असुन त्यामूळे वायरमनला तिथे पोहचण्यास अडथळे येत असुन देखभाल दुरुस्तीच्या कामात विलंब होतो. ह्याबाबत अनेक तक्रारी कामोठे कॉलनी फोरमच्या समन्वयकांकडे प्राप्त झाल्या होत्या. ह्याचीच दखल घेत आज कामोठे कॉलोनी फोरमच्या पदाधिकारी ह्यांनी कार्यकारी अभियंता सरोदे ह्यांची भेट घेतली. ह्यावेळी निवेदनासोबतच शहरातील विविध ठिकाणच्या डी पी चा जवळपास पन्नास फोटोचा अल्बम अभियंता दाखवण्यात आला. ह्यावेळी विषयाचे गांभीर्य लक्षात घेता कार्यकारी अभियंता ह्यांनी अभियंता सुर्यतळ ह्यांना जॉइंट पाहणी करण्यास सांगितले तसेच पुढील १५ दिवसांत सर्व डी पी बॉक्स दुरुस्त करण्याचे आदेश दिलेत.

तसेच ह्यावेळी कामोठे शहरातील वारंवार खंडीत होणारा वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी कामोठे शहराचे स्वतंत्र उपकेंद्र सुरु करण्याची मागणी फोरम च्या वतीने करण्यात आली. त्यावेळी कामोठे शहरासाठी स्वतंत्र उपकेंद्राचा प्रस्ताव मुख्यालयात मंजुरीसाठी पाठवल्याचे अभियंत्यांनी सांगितले.

लवकरच मंजुरी मिळवून कामोठे उपकेंद्राचे काम सुरु करुन वीजपुरवठा सुरळीत करणार असल्याची माहिती ह्यावेळी कार्यकारी अभियंता सरोदे साहे यांनी दिली. ह्यावेळी कामोठे कॉलोनी फोरमचे अध्यक्ष मंगेश अढाव, कॉलोनी फोरमचे समन्वयक बापू साळुंखे, डॉ. गारळे, राहुल बुधे, अरुण जाधव, संतोष अलदार, भरत उतेकर, रविंद्र पाधी, सुनिल कदम अणि संदीप इथापे उपस्थित होते.

# पनवेल रेल्वे स्थानक परिसरात प्रिपेड ऑटो रिक्षा बुथ चालविण्याकरीता इच्छुकांना आवाहन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्थानकावरील रेल्वे प्रशासनाने निश्चित केलेल्या जागेवर प्रिपेड ऑटो रिक्षा बुथ चालविण्यासाठी आवश्यक कर्मचारी, वस्तू व इतर प्राथमिक सेवा सुविधा पुरविणाऱ्या इच्छुक नोंदणीकृत सेवाभावी संस्था/रिक्षा संघटनांकडून लेखी स्वरुपात होकार कळविण्याबाबतचे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल यांनी केले आहे.

मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाने पनवेल रेल्वे स्टेशन व एसटी स्टँड येथे प्रिपेड ऑटो रिक्षा बुथ सुरु करण्याच्या प्रस्तावास मंजूरी दिली आहे. त्याअनुषंगाने मध्य रेल्वे मुंबई सीएसटीचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांनी पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात प्रिपेड ऑटो रिक्षा बुथ सुरु करण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून दिली आहे. या प्रिपेड ऑटो रिक्षा योजनेमुळे ऑटो रिक्षा चालक तसेच प्रवासी या दोघांनाही फायदा होणार आहे. या योजनेमुळे प्रवाशांना सुरक्षित व निश्चित दरामध्ये सेवा उपलब्ध होईल. ऑटो रिक्षा चालकास विहित भाडे दरापेक्षा प्रोत्साहनपर जास्त उत्पन्न मिळेल. ऑटो रिक्षा चालकांकडून कमी अंतराचे भाडे नाकारण्याचे प्रमाण कमी होईल. ऑटो रिक्षा व्यवसायाचा दर्जा उंचावून प्रतिष्ठा प्राप्त होण्यास मदत होईल. प्रवाशी व ऑटो रिक्षा चालक यांच्यामध्ये समन्वय निर्माण होईल. जादा भाडे आकारणे, भाडे नाकारणे, प्रवशांची फसवणूक करणे याबाबींना या योजनेमुळे आळा बसेल. रेल्वे स्थानकावर शिस्त वाढण्यास मदत होईल.

ही प्रिपेड ऑटो रिक्षा योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी व तत्काळ सुरु करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने निश्चित केलेल्या जागेवर बुथ उभारणे, प्रिपेड सेवेसाठी संगणक, प्रिंटर, स्टेशनरी, विद्युत बील, फोन बील, फर्निचर, टेबल खुर्ची, पाणी पुरवठा, २४ तास सेवा देण्याकरीता किमान कर्मचारी इत्यादी प्राथमिक सेवासुविधा उपलब्ध करून प्रिपेड बुथ चालविण्याकरीता इच्छुक नोंदणीकृत सेवाभावी संस्था/रिक्षा संघटनांकडून लेखी स्वरुपात होकार कळविण्याबाबतचे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल यांनी एका प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.

# राज्य व राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत पालीतील पूरब शहाची उत्तुंग कामगिरी

**दै.रायगड नगरी । सुधागड /पाली**

पालीतील पुरब वरूण शहा या लहानग्याने राज्य व राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत उत्तुंग कामगिरी केली आहे. पुरब हा होली एंजल स्कुलमध्ये इयत्ता पहिलीत आहे.

एवढ्या लहान वयात त्याने नुकत्याच झालेल्या कोल्हापूर मॅट्स अबॅकस स्पर्धेत व सीमा अकॅडमी सोलापूर येथील अबॅकस स्पर्धेत पहिला क्रमांक मिळवला आहे. तर दिल्ली येथे झालेल्या अबॅकस स्पर्धेत दुसरा क्रमांक पटकावला असून पुरबने तब्बल तीन पदकांवर व प्रमाणपत्रांवर आपले नाव कोरले आहे. पूरबला अबॅकसचे मार्गदर्शन राजश्री लर्निंग सेंटरच्या संचालिका राजश्री बोलके या करीत आहेत. पुरबच्या या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे.



# रौप्यमहोत्सवात कुणबी समाजोन्नती संघ म्हसळा तालुका शाखेने केला गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा आणि शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या कुणबी समाजोन्नती संघ मुंबई म्हसळा तालुका शाखेचे रौप्यमहोत्सवी वर्ष मोठ्या उत्साहात बोरीवली येथे फुलपाखरू उद्यान सभागृहामध्ये तीन सत्रात संपन्न झाला. सोहळ्यात शाखेचा मागील २५ वर्षाचा विद्यार्थी गुणगौरवाचा मागोवा घेण्यात आला. कार्यक्रमाचे सुरवातीला मान्यवरांचे हस्ते राजे छत्रपती शिवाजी महाराज, संत शिरोमणी तुकाराम महाराज, श्री गणेश, विद्यादेवता सरस्वती मातेच्या फोटो प्रतिमेचे पुजन करण्यात आले.



या वेळी मान्यवरांनी ग्रामीण शाखेचे माजी अध्यक्ष, रायगड जिल्हा कुणबी समन्वय समितीचे उपाध्यक्ष,कणघर ग्राम पंचायत सरपंच श्रीपतराव धोकटे, तुकाराम गीजे आणि अन्य परिवारातील दिवंगत समाज बांधव भगिनीना भावपुर्ण श्रध्दांजली वाहिली. सत्कारमूर्तींचे हस्ते गुणवंत विध्यार्थ्यांचा प्रमाणपत्र आणि भेटवस्तू देवुन गौरव केला. सरचिटणीस महेश शिर्के यांनी उपस्थितांना कुणबी संघाचा १०१ वर्षाचा इतिहास व पुढील वाटचाल तसेच समाजाचे मुलुंड येथील विद्यार्थी वसतिगृहा बाबत हितंबूत माहिती दिली. समाज कार्यास अमूल्य योगदान देणारे संदेरी गावचे समाजबांधव उद्योजक जयंत चिबडे, समाज मंदिर बांधकामासाठी जागेची उपलब्धता करून दिलेले सुपरिवाला बंधु, रजिस्टर प्रोसेस करणारे रिकामे यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. आयोजित कार्यक्रमात शाखेला नेहमीच सहकार्य करणारे दानशूर समाज बांधव तसेच तालुक्यातील उत्तीर्ण झालेल्या ४०० विद्यार्थी-विद्यार्थ्यांनीचा सत्कार करण्यात आला. यशस्वी विद्यार्थी वर्गात २ वकील, १० इंजिनिअर, ६८ पदवीधर,१२० बारावी आणि २२० दहावीचे विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात आली होती. अहमदाबाद येथे आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत सिल्वर मेडल पटकावलेल्या संदेरी गावातील श्रुष्ठी अनिल वाघे हिला विशेष सत्कारीत करण्यात आले. कार्यक्रमाला शाखेचे अध्यक्ष राजाराम गावडे, संघ उपाध्यक्ष बबन उंडरे, राजकिय संघटन समितीचे अध्यक्ष कृष्णा कोबनाक, तालुक्यातील सर्व गावातील अध्यक्ष, सचिव,समाज प्रतिनिधी, आजी माजी समाज पदाधिकारी, युवक मंडळी यांनी उपस्थितीत राहून कार्यक्रमाची शोभा वाढवून भविष्यात असे अनेक उपक्रम आयोजित करण्याची ऊर्जा हा कार्यक्रम देऊन गेल्याचे उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले.

# नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. १ वर सीएमआरएसकडून १७ आणि १८ जानेवारी २०२२ रोजी सुरक्षाविषयक चाचणी घेण्यात येणार

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडको महामंडळाच्या नवी मुंबई मेट्रो प्रकल्पातील बेलापूर ते पेंधर या मार्ग क्र. १ वर धावणाऱ्या मेट्रोची सुरक्षाविषयक चाचणी १७ आणि १८ जानेवारी २०२२ रोजी मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्त (सीएमआरएस) यांच्या पथकाकडून घेण्यात येणार आहे. या मार्गावर प्रत्यक्ष प्रवासी वाहतूक सुरू करण्याकरिता सीएमआरएस यांच्याकडून देण्यात येणारे सुरक्षाविषयक प्रमाणपत्र हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा असणार आहे.

सिडकोतर्फे नवी मुंबईतील सार्वजनिक परिवहन व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने नवी मुंबई मेट्रो प्रकल्पांतर्गत एकूण ४ उन्नत मार्ग विकसित करण्यात येत आहेत. त्यांपैकी मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर हा एकूण ११ कि.मी. लांबीचा, ११ स्थानकांसह तळोजा येथे आगार (डेपो) असणारा मार्ग आहे. मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर या मार्गाच्या अंमलबजावणीचे काम सिडकोककडून महा मेट्रोला सोपविण्यात आले होते. या मार्गावर धावणाऱ्या मेट्रोच्या आतापर्यंत ऑसिलेशन, विद्युत सुरक्षा, इमर्जन्सी ब्रेक इ. महत्त्वाच्या चाचण्या यशस्वीरीत्या पार पडून त्या संदर्भातील प्रमाणपत्रही आरडीएसओकडून प्राप्त झाले आहे.

सीएमआरएस यांच्याकडून घेण्यात येणारी सुरक्षाविषयक चाचणी व त्यानंतर प्रदान करण्यात येणारे प्रमाणपत्र हे मेट्रो मार्गावर प्रवासी वाहतूक सुरू करण्याकरिता अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. सीएमआरएस यांच्या पथकाकडून १७ आणि १८ जानेवारी रोजी सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक व संबंधित अधिकारी तसेच महा मेट्रोचे अधिकारी यांच्या उपस्थितीत मार्ग क्र. वर आणि तळोजा आगार येथे मेट्रोची सुरक्षाविषयक चाचणी घेण्यात येणार आहे.

या अंतर्गत रिकाम्या गाडीची तसेच एडब्लू३ मानकांनुसार (कमाल प्रवासी क्षमता) भारासह धावणाऱ्या गाडीची चाचणी, आगार व डीसीसी निरीक्षण, अंडरगिअर परीक्षण, अग्नी/धूर विषयक चाचणी, प्रवासी निर्वासन चाचणी, ध्वनी चाचणी इ. महत्त्वाच्या चाचण्या घेण्यात येणार आहेत. या चाचण्या यशस्वीरीत्या पार पडल्यानंतर, सीएमआरएस आणि रेल्वे मंडळ यांच्याकडून प्रत्यक्ष प्रवासी वाहतूक सुरू करण्यासाठी सुरक्षाविषयक प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे.

> सीएमआरएस यांच्याकडून प्राप्त करण्यात येणारे सुरक्षाविषयक प्रमाणपत्र हा प्रवासी वाहतूक सुरू करण्याच्या दिशेने महत्त्वाचा टप्पा आहे. सदर प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर लवकरच मार्ग क्र. १ वर (पेंधर ते सेंट्रल पार्क) प्रवासी वाहतुकीस प्रारंभ होऊन नवी मुंबईकरांचे मेट्रो प्रवासाचे स्वप्न पूर्ण होणार आहे.
>
> **डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## मोरा येथे घराला आग ; पती-पत्नी किरकोळ भाजले

घरगुती लहान गॅस सिलेंडर लिकेज झाल्याने आग लागली. असा प्राथमिक अंदाज आहे. या आगीत घरातील जगदीश हरी कोळी (वय-६२) धंदा-मजुरी व पत्नी वत्सला जगदीश कोळी (वय-६०) हि किरकोळ भाजली असून त्यांना उपचारासाठी उरण येथील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले आहे.

आग सुमारे दुपारी ३ च्या सुमारास लागली होती. आग विझविण्यासाठी एन.ए.डी.फायर ब्रिगेड करंजा, ओ एन जी सी फायर ब्रिगेड व सिडको (द्रोणागिरी) फायर ब्रिगेड यांनी घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली. सुदैवाने घरातील सर्वसमान भस्मसात झाले आहे.

## कर्जतमध्ये भाजपला मोठा राजकीय धक्का

आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भाजपमधील या दोन दिग्गज नेत्यांसह युवा कार्यकर्ता हर्षद पिंपरकर, किरण सावंत, पंढरीनाथ ठोंबरे, विलास जाधव, राघो ठोंबरे, मनोहर ठोंबरे, लहु ठोंबरे, जैतु ठोंबरे, संतोष ठोंबरे, अजय ठोंबरे, भरत ठोंबरे, आदिनाथ ठोंबरे, आदित्य पारधी, पद्माकर ठोंबरे, महेंद्र वारे, गणेश ठोंबरे, सचिन पारधी, दत्ता ठोंबरे, योगेश ठोंबरे, सखाराम जाधव, मंगल ठोंबरे, जिजा वाघ, लता दरोडे, कमा जाधव, तारा ठोंबरे, सुमन जाधव, सुरेखा ठोंबरे, निवीता ठोंबरे, देवकी वारे, सोनी ठोंबरे, सुहा ठोंबरे, नमीबाई ठोंबरे, सगुणा पारधी, जयश्री ठोंबरे, अलका ठोंबरे, तुळशी ठोंबरे, उर्मिला बांगारे, आशा ठोंबरे, हौसा ठोंबरे, सविता ठोंबरे, तान्हाबाई ठोंबरे या पिंपरकरपाडा, पेठ व हिरेवाडी येथील अनेकांनी शिवसेना पक्षात जाहिर पक्षप्रवेश केला.

## माजी शहर प्रमुख प्रदीप वर्तक शिवसेनेत

दाखवला तो सार्थ ठरवेन. पेण तालुक्यात शिवसेना पक्ष वाढीसाठी प्रयत्न करणार. पेण शहरच नव्हे तर ग्रामीण भागातही पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी सर्वांना एकत्र सोबत घेऊन काम करणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.

# स्व.तुकाराम नारायण घरत यांची पुण्यतिथी विविध ठिकाणी साजरी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष महेंद्र घरत यांचे पिताश्री स्वर्गीय तुकाराम नारायण घरत यांची सातवी पुण्यतिथी त्यांच्या शेलघर येथील घरी तसेच न्यु इंग्लिश स्कुल गव्हाण व मोरू नारायण म्हात्रे विदयालय उलवे येथे साजरी करण्यात आली.

लोकनेते रामशेठ ठाकूर, शिवसेना जेष्ठ नेते बबनदादा पाटील तसेच इतर अनेक मान्यवर, नातेवाईक व कुटुंबियांनी स्वर्गीय दिबा पाटील साहेब व दत्तूशेठ पाटील यांचे सहकारी स्वर्गीय तुकाराम नारायण घरत यांना आदरांजली वाहिली.

# वाढदिवसाचे अभिष्टचिंतन नको, आरोग्य चिंतनासाठी आरोग्य शिबिरे ठेवावीत : प्रितम म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सध्याच्या पनवेलमधील कोविडचे वाढते रुग्ण पाहता वाढदिवस साजरा न करण्याचे विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांनी ठरविले आहे.



त्यासंदर्भात त्यांनी पक्षातील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते आणि हितचिंतक यांना आवाहन केले आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने कोणताही केक कापण्याचा कार्यक्रम करू नये त्याऐवजी नागरिकांना आवश्यक त्या आरोग्य सुविधा कशा पोहोचतील यावर लक्ष द्यावे. वाढदिवसानिमित्त कोणताही बुके घेऊन मला भेटू नये त्याऐवजी आपल्या घरातील जवळच्या परिसरात एखादे झाड लावून त्याचा सेल्फी काढून तो फोटो मला शुभेच्छा म्हणून पाठवाव्यात जेणेकरून भविष्यातील पिढीला ऑक्सिजन विकत न घेता पर्यावरण जोपासल्यामुळे त्याचा सहाजिकच फायदा होईल. या सर्व उपक्रमात कोणत्याही प्रकारची मदत लागल्यास शेतकरी कामगार पक्ष आणि जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्था यांच्या माध्यमातून सर्वतोपरी सहकार्य मिळेल अशी भावना विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी व्यक्त केली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# मराठी भाषा संवर्धनासाठी आपण सारे होऊ कटिबद्ध : नागेश कुलकर्णी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

शासनाने दि.१४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२२ हा कालावधी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्याचे नियोजन केले आहे. शासनाच्या या स्तुत्य उपक्रमात समाजातील विविध घटकांनी सहभागी व्हावे, तुम्ही-आम्ही सारे या निमित्ताने मराठी भाषा संवर्धनासाठी कटिबद्ध होऊ या, असे आवाहन रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष तथा रायगड जिल्हा ग्रंथालयाचे माजी अध्यक्ष श्री.नागेश कुलकर्णी यांनी आज येथे केले.



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा या उपक्रमाचा दिमाखदार उद्धाटन कार्यक्रम कोविड मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करून संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) तथा प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी सर्जेराव म्हस्के-पाटील, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) स्नेहा उबाळे, जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके, जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप, तहसिलदार विशाल दौंडकर व जिल्हाधिकारी कार्यालयातील इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

श्री.नागेश कुलकर्णी पुढे म्हणाले की, मराठी भाषा आपला स्वाभिमान आहे. आपल्या मातृभाषेतूनच आपल्या मुलांची आकलन शक्ती अधिक प्रभावीपणे वाढीस लागते. आपल्या सर्वांना आपल्या मातृभाषेचा अभिमान आवश्यकच आहे, त्यासाठी आपल्या मातृभाषेच्या मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आपण सारे कटिबद्ध होऊ या. याकरिता जिल्ह्यातील ग्रंथालये महत्त्वाची भूमिका निभावू शकतील. जिल्ह्यात जवळपास ८ ग्रंथालये शंभर वर्षाहून अधिक परंपरा असलेले आहेत तर एकूण ग्रंथालये ७८ आहेत. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उपक्रमात ग्रंथालय व ग्रंथालय चळवळीशी संबंधित सर्व नागरिक सहभागी होतील, असेही ते शेवटी म्हणाले.

आपल्या प्रास्ताविकपर भाषणात प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी सर्जेराव म्हस्के-पाटील यांनी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्याचे प्रयोजन, यानिमित्त जिल्हा प्रशासनामार्फत कोण-कोणते उपक्रम राबविले जाणार आहेत, याविषयीची माहिती उपस्थितांना दिली. जिथे कोविड मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून कार्यक्रम आयोजित करणे शक्य आहे तिथे काही कार्यक्रम राबविले जातील तर बाकी सर्व कार्यक्रम ऑनलाईन आयोजित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांनी मराठी भाषेचे दैनंदिन जीवनातील व प्रशासकीय कामकाजातील व्यावहारिक महत्व याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येत असलेल्या विविध लोकोपयोगी उपक्रमांचीही माहिती दिली.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने जिल्हाधिकारी कार्यालयाचा तळमजला खूपच देखण्या रीतीने सजविण्यात आला होता. मराठी भाषेचे महत्व अधोरेखित करणाऱ्या रांगोळ्या, भित्तीचित्रे, पोस्टर्स सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. कार्यक्रमाचे उद्धाटन मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले तर सांगता पसायदानाने करण्यात आली. सूत्रसंचालन तहसिलदार विशाल दौंडकर यांनी केले.

## संक्षिप्त...

### रयत महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्या रायगड महिला जिल्हाध्यक्षपदी कांचन जाधव

**दै.रायगड नगरी । खोपोली**

कामगार नेते सिध्दार्थ दादासाहेब गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणाऱ्या रयत महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्या रायगड महिला जिल्हाध्यक्षपदी कांचन संजय जाधव यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली.

रायगड जिल्हाध्यक्ष दत्तात्रेय गिलबिले यांनी नुकतेच रायगड महिला जिल्हाअध्यक्ष कांचन संजय जाधव यांना नियुक्ती पत्रक तसेच पुष्प गुच्छ देऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी रायगड जिल्हा सचिव राकेश मोरे, रायगड जिल्हा संघटक महेंद्र किंळनजे, रायगड जिल्हा संपर्क प्रमुख संदीप माळी, रायगड जिल्हा उपाध्यक्ष अनवर पिंजारी, नम्रता चौघुले आदी उपस्थित होते.



### मानवता फाऊंडेशनच्या माध्यमातून गोरगरीबांना मायेची ऊब

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सध्याच्या थंडीच्या काळामध्ये रस्त्यावर वास्तव्य करणाऱ्या नागरिकांचे हाल होत आहेत. त्यांना मानवता फाऊंडेशनच्या माध्यमातून मायेची ऊब म्हणून ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.

पनवेल परिरासह नवी मुंबई आदी ठिकाणी मानवता फाऊंडेशनच्या माध्यमातून रस्त्यावर राहणाऱ्या गरिबांना थंडी पासून बचाव करण्यासाठी ब्लँकेट्स चे वाटप करण्यात आली त्या वेळी अध्यक्ष संजय पवार, कार्याध्यक्ष अभिजित सांगळे, खजिनदार शीतल मोरे, स्वाती पाटील , तुषार डीकुले , व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

### सिल्पाद्वारे व्हॅक्सिनेशन ऑन व्हील्स कार्यक्रमाची सुरूवात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलच्या ग्रामीण भागामध्ये नोव्हेंबर २०२१ मध्ये व्हॅक्सिनेशन ऑन व्हील्स हा कार्यक्रम सुरू झाला. सिप्ला द्वारे हे आयोजित करण्यात येत आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या बेलवली येथील प्राथमिक शाळेत हे शिबिर घेण्यात आले. गेल्या ३ महिन्यांत ७ हजार लोकांना लसीकरण करण्यात आले आहे. यावेळी तहसीलदार विजय तळेकर, सिप्लाच्या उल्का धुरी आदी उपस्थित होते.

# खोपोली बाजारपेठेतील ‘सम्राट बार’ बंद करा

## व्यापारी, गुजराती समाज, मनसेने उघडली मोहीम

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खोपोली बाजारपेठेतील मध्यभागी असलेल्या विराट कॉम्पलेक्समधील सम्राट हॉटेल व बार विरोधात व्यापाऱ्यांमध्ये रोष निर्माण झाला आहे. कृष्ण मंदिरासह जुन्या हनुमान मंदिरापासून हाकेच्या अंतरावर असलेला हा बार बंद करण्याची मागणी व्यापारी, गुजराती समाज,मनसेने केली आहे.



व्यापाऱ्यांसह महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने यात मोठी भुमिका घेवून सर्व वरिष्ठ पातळीवर तक्रार करुन याचा पाठपुरावा केला आहे. मनसेचे संजय तन्ना, मितेश शहा, शहर अध्यक्ष अनिल मिंडे यांनी हा बार बंद करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. बाजारपेठेतील व्यापा-यांची घरे दुकानाच्या मागच्या बाजूस आहेत. त्यातच रोज सकाळ, संध्याकाळी गुजराती समाज मोठ्या प्रमाणात श्री कृष्ण मंदीरात दर्शनासाठी कुटुंबासह जातात तसेच हनुमान मंदीरात भक्तांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात असते. बाजारपेठेतील मुख्य रस्त्यावर दर्शनी भागातच इमारतीच्या प्रवेशद्वारात बारचे मोठे बोर्ड लावल्याने व्यापा-यांसह भक्तांमध्ये प्रचंड नाराजी आहे.

सम्राट बार बंद व्हावा, यासाठी व्यापारी, गुजराती समाज तसेच मनसेने मोहीम उघडली आहे. गुजराती समाजाचे शैलेश विठलाणी, पंडित शहा, पकंज विठलाणी, व्यापारी सघंटनेचे अध्यक्ष कांतीलाल शहा, देवेंद्र अजित जैनसह अनेक पदाधिका-यांनी बारला हद्दपार करण्यासाठी कंबर कसली आहे. मनसेचे शहराध्यक्ष अनिल मिंडे, संजय तन्ना, मितेश शहा यांनी पुढाकार घेवून राज्य उत्पादन शुल्क, खोपोली नगरपालिका यांच्याकडे सम्राट बार बंद करण्याची मागणी केली आहे.

# माथेरानच्या अधिक्षकपदी दिक्षांत देशपांडे

**दै.रायगड नगरी । कर्जत**

माथेरानचे अधिक्षक बापू भोई यांची आठ ऑगस्ट रोजी बदली होती त्यांच्या रिक्त पदावर सांगली येथिल तहसीलदार दिक्षांत देशपांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



माथेरानचे बापु भोई यांची बदली झाल्यावर गेली पाच महिने येथील अधिक्षक पदाचा अतिरिक्त कारभार कर्जतचे तहसीलदार विक्रम देशमुख यांच्या कडे होता त्यांनीही तो यशस्वी रित्या सांभाळला पण माथेरान करता काही कामासाठी कर्जत येथे जावे लागत असे, या करता येथील रिक्त असलेले अधीक्षक पद भरणे गरजेचे होते.

शासनाने नुकतेच हे रिक्त पद भरले असून येथे सांगली येथील तहसीलदार दिक्षांत देशपांडे यांची नियुक्ती केली असून आता माथेरानची कामे लवकरात लवकर मार्गी लागतील तसेच नव्याने रुजू झालेले अधिक्षक देशपांडे यांनी येथील कारभार स्वच्छ आणि पारदर्शक ठेवण्यात साठी तसेच नागरिकांची कामे लवकरात लवकर कशी होतील याला प्राध्यान दिले जाईल तसेच शासना महसूल वाढी करता ही प्रयत्न केले जातील असे सांगितले.

# नांदगावमध्ये महिला सक्षमीकरण जनजागृती शिबीर

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

केंद्रीय कामगार शिक्षण बोर्ड, श्रम रोजगार मंत्रालय (भारत सरकार) आणि खरसई येथील सोमजाई क्रीडा मंडळ (ट्रस्ट) यांच्या संयुक्त विद्यमाने मुरुड तालुक्यातील नांदगाव-गणेश नगर (कुंभार वाडा) येथे दोन दिवसीय महिला सक्षमीकरण जनजागृती शिबिर घेण्यात आले.

या शिबिरामध्ये केंद्रीय कामगार शिक्षण बोर्डाचे शिक्षणाधिकारी चंद्रसेन जगताप व कामगार शिक्षक चंद्रकांत खोत यांनी कुटुंब गुणवत्ता, बचत गट निर्मिती, महिला लघुउद्योग त्याचबरोबर कोव्हीड-१९ रोगाबाबत माहिती, महिला सबलीकरण, आरोग्य विषयक तसेच शासकीय योजनांची सविस्तर महत्त्वपूर्ण माहिती दिली. आतापर्यंत अशाप्रकारे पंचक्रोशीतील वेळास्ते, वांद्रे व मजगांव मध्ये महिला सक्षमीकरण जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. भा.ज.पा.तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, काशिनाथ गाणार व त्यांच्या सहकाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.



# १००% लसीकरण करणाचा पाहिला मानकरी ठरली काळसुरी ग्रामपंचायत

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

कोरोनाची संभाव्य तिसरी लाट येऊ नये यासाठी १८ वर्षावरील नागरिकांचे लसीकरण करून घेण्यात आले.त्यानंतर शासनाने १५ ते १८ वयोगटातील किशोर वयीन मुलांचे लसीकरण सुरु केले आणि बघता बघता सर्वांचे सहकार्याने आमची काळसुरी ग्रामपंचायत १०० % कोविड प्रतिबंधत्मक लसीकरण झालेली म्हसळा तालुक्यातील पहिली ग्रामपंचायत ठरली असे प्राथमिक आरोग्य केंद्र मेंदडीच्या वैद्यकिय आधिकारी डॉ.पूजा डोंगरे यानी आमच्या प्रतिनिधीला सांगितले. सकारात्मक सहकार्याने अन्य लक्ष्य पूर्ण करणार हे सांगताना डोंगरे यांच्यात आपल्या सहकाऱ्यांबद्दल प्रचंड आत्मविश्वास आसल्याचे जाणवत होते. त्यानीआम्ही १५ ते १८ वयोगटातील किशोर वयीन मुलांचे शाळेतच लसीकरण करताना ग्रामपंचायत सरपंच, प्रतिष्ठित मंडळी, केंद्रप्रमुख, स्थानिक शिक्षक,सर्कल, तलाठी, अंगणवाडी सेविका- मदतनीस पोलीस पाटील, कोतवाल, यांच्या सहकार्याने संपूर्ण गावांत लसीकरणाबाबत सकारात्मक व एकसंधपणे केलेल्या जनजागृती मुळे हे यश आल्याचे सरपंच सौं. अरुणा नात्की यानी सांगितले. ग्रामपंचायत हद्दींत१५ते १८ वर्षावरील लाभार्थी २९ आणि १८ वर्षावरील लाभार्थी ५७८ आहेत. यावेळी १५ ते १८ वर्षामधील २००७ किंवा त्यापूर्वी जन्मलेली सर्व किशोर वयीन शाळबाह्य मुलांचे लसीकरणावर सुद्धा आरोग्य विभागाचे बारकाईने लक्ष होते. हे उद्दीष्ट १०० % पूर्ण झाले आहे.

# अवकाळी पावसाने वीटभट्टी व्यवसायाचे नुकसान

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

अवकाळी पावसामुळे जिल्ह्यातील वीटभट्टी व्यवसाय संकटात सापडला आहे. शनिवारी (ता.८) जिल्ह्यात सर्वत्र कमी अधिक पाऊस पडला आहे. त्यामुळे ऐन हंगामात वीटभट्टी चालक व मालकांना नुकसानीला सामोरे जावे लागले.

सध्या ठिकठिकाणी लहान-मोठया वीटभट्ट्या सुरू झाल्या आहेत. जिल्ह्यात कित्येक कोटींची उलाढाल या उद्योगात होते. सध्या सर्वत्रच मोठ्या प्रमाणात विटभट्ट्या सुरू झाल्या आहेत. मात्र अवकाळी पावसामुळे असंख्य कच्च्या विटा खराब झाल्या आहेत. विटा पाडण्यासाठी जमा करून ठेवलेली माती देखील पावसामुळे वाहून गेली किंवा भिजली आहे. विटा भाजण्यासाठी लागणार भाताचा कोंडा, कोळसा किंवा तूस देखील पावसामुळे भिजल्याने वीटभट्टी लावणे म्हणजेच पक्क्या विटा पडणे देखील मुस्किल झाले आहे.

निसर्गाच्या लहरीपणामुळे अशा विविध मार्गाने वीटभट्टी चालक व मालकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. मागील वर्षी लॉकडाऊन, आता कडक निर्बंध आणि अवकाळी पाऊस यामुळे वीटभट्टी मालकांना व चालकांना नुकसानीला सामोरे जावे लागले आहे. शासनाकडून शेतीसाठी थोडीबहुत नुकसान भरपाई मिळते मात्र वीटभट्टी चालक व मालकांसाठी तशी कोणतीच तरतूद नाही. परिणामी आलेल्या परिस्थितीवर मात करत तग धरण्याशिवाय त्यांना गत्यंतर नाही.



# रिक्षाला वाहनाची धडक दोघेजण जागीच ठार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका अज्ञात वाहनाची धडक रिक्षाला बसल्याने झालेल्या अपघातात रिक्षा चालक व त्याच्या पाठीमागे बसलेला प्रवाशी या दोघांचा मृत्यू झाल्याची घटना मुंबई-पुणे एक्सप्रेस महामार्गावर पनवेलजवळ घडली आहे.

रिक्षा चालक अप्पू शेखप्पा अलूर (५३) हे एका प्रवाशाला घेवून एक्सप्रेस मार्गावरुन बंदी असतानाही रिक्षा घेवून जात असताना कळंबोली सर्कलपासून अंदाजे दिड कि.मी. अंतरावर त्या रिक्षाला अज्ञात वाहनाची समोरुन धडक बसल्याने झालेल्या अपघातात यात दोघांचा मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.प्रदीपकुमार केदारनाथ अग्रवाल हे खालील वर्णनाचा भूखंड १) श्री.तुकाराम अरुण कदम व २) श्रीमती.अश्विनी तुकाराम कदम (५०% दोघांचा) ३) स्नेहल एस शहा (एच.यु.एफ) (५०%) यांचेकडून त्रिपक्षीय करारनामाद्वारे हस्तांतरण करून घेत आहेत.

**मिळकतीचे वर्णन संचिका क्र.ओवळे-२९१**

| नोड | भूखंड क्र. | सेक्टर | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पकनगर दापोली | ९२ | ३ | १६० चौ.मी. |

तरी याबाबत कोणाही व्यक्ती / व्यक्तीचे किंवा आर्थिक संस्थाचे भूखंड संदर्भात तसेच कुठल्याही प्रकारचे प्रलंबित दावे मे.न्यायालयीन तसेच उच्च व कनिष्ठ न्ययालयीन दावे, हरकती, जसे विक्री, बोजा, दान, गहाण, सरकारी, निमसरकारी, कंपनी, बक्षिस भाडेपट्टा, वारसा हक्क, लोन किंवा इतर काही असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाचे आत कागदपत्रासोबत खालील पत्यावर समक्ष भेटावे.

दि.१४/०१/२०२२

सही/-
ॲड.सौ.रेखा होवाळे
शॉप नं.१३, प्रभात सेंटर,
सि.बी.डी.बेलापूर



### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, १) श्री.दिलीप तुकाराम भोईर २) श्री.दत्ता रामा पाटील ३) श्री.रमेश रामा पाटील तिघे ही राहणार : कुंडेवहाळ, ता.पनवेल, जिल्हा : रायगड ४) श्रीमती.वत्सला चंद्रकांत पाटील राहणार : पाटणोली, पो.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जिल्हा : रायगड ५) श्रीमती.सरिता पांडुरंग पाटील राहणार : मु.सांगडे, पो.अजिवली, ता.पनवेल, जिल्हा : रायगड ६) सौ.अनिता राजू सुर्यवंशी, रा.चिरनेर, ता.पनवेल, जि.रायगड ७) श्रीमती.राधाबाई रामचंद्र पाटील उर्फ राधाबाई रामचंद्र घोरपडे राहणार : वडगांव वाशिवली, ता.पनवेल, जिल्हा : रायगड ८) श्रीमती.रुक्मिणी धर्मा शेळके राहणार : आसुडगांव, ता.पनवेल, जिल्हा : रायगड ९) श्रीमती.लक्ष्मी विश्वनाथ ठाकूर उर्फ लीना विश्वनाथ ठाकूर राहणार : मुळपाडा, चिरनेर, ता.पनवेल, जिल्हा : रायगड १०) श्रीमती.शिमगीबाई बाबु भोईर राहणार : मोरावे, ता.पनवेल, जिल्हा : रायगड हे खालील वर्णनाची जमीन मिळकत श्री.मच्छिंद्र तुकाराम भोईर राहणार : कुंडेवहाळ, ता.पनवेल, जिल्हा : रायगड यांचे नावे हक्कसोडपत्राद्वारे हस्तांतरीत करीत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | भूमापन क्र. | भूमापन क्रमांकाचा उपविभाग | क्षेत्र |
|---|---|---|---|
| कुंडेवहाळ | ७९ | ३ | ०-०३-०<br>वर्ग (अ) ०-००-८ |

तरी याबाबत कोणाही व्यक्ती / व्यक्तीचे किंवा आर्थिक संस्थाचे भूखंड संदर्भात तसेच कुठल्याही प्रकारचे प्रलंबित दावे मे.न्यायालयीन तसेच उच्च व कनिष्ठ न्ययालयीन दावे, हरकती, जसे विक्री, बोजा, दान, गहाण, सरकारी, निमसरकारी, कंपनी, बक्षिस भाडेपट्टा, वारसा हक्क, लोन किंवा इतर काही असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाचे आत कागदपत्रासोबत खालील पत्यावर समक्ष भेटावे.

दि.१४/०१/२०२२

सही/-
ॲड.सौ.रेखा होवाळे
शॉप नं.१३, प्रभात सेंटर,
सि.बी.डी.बेलापूर



अर्जदाराचे वकील : ॲड.गणेश मुकणे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे न्यायालयात

फौ.चौ.अर्ज क्र.१२६२/२०२१
नि.नं.६/ड
ने.ता.११/०२/२०२२

श्री.सुरेश आत्माराम भोईर
वय : ४४ वर्षे,
रा.वरची आळी, ओएनजीसी कॉम्प्लेक्स,
विचुंबे, ता.पनवेल, जि.रायगड ... अर्जदार

विरुद्ध

मा.ग्रामसेवक / सरपंच सो
ग्रामपंचायत विचुंबे,
ता.पनवेल, जि.रायगड ... सामनेवाला

तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांची आई कै.बारसुबाई आत्माराम भोईर यांचा मृत्यू दि.१७/१२/२००५ रोजी मौजे : विचुंबे, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे. त्यांच्या मृत्यूची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मा.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू कै.बारसुबाई आत्माराम भोईर वरील नमूद ठिकाणी मयत झालेल्या आहेत किंवा कसे याबद्दल कोणास काही कळविण्याचे असेल व सदरहू अर्जास कुणाची हरकत असेल, तर या जाहीर नोटीसच्या तारखेपासून १ महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या कायदेशीर हरकती नोंदविण्याचे आहेत. या लेखावरुन असे कळविण्यात येत आहे की, जर सदरहू मुदतीत योग्य हरकती न आल्यास तर सदरहू न्यायालयात अर्जदार यांच्याकडून योग्य तो पुरावा घेवून त्यांस सदरहू व्यक्तीच्या मृत्यूची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

आज दि. माहे २०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, मौजे : करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड येथील सिडको हद्दीतील खालीलप्रमाणे वर्णन केलेली सदनिका मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड येथील सिडको यांचे हद्दीतील सेक्टर ३ येथील प्लॉट नं.६१, वरील ''स्वराज हाईटस'' मधील दुसऱ्या मजल्यावरील मधील सदनिका नं.२०१ ज्याचे क्षेत्रफळ ४०.३३७ चौ.मीटर कारपेट / बिल्टअप एरिया.**

वर वर्णन केलेली मिळकत श्री.अमित कुमार प्रसाद व मे.स्वराज होम्स बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार १) श्री.संतोष हिराजी ठाकूर, २) श्री.रुपेश हिराजी ठाकूर, ३) श्री.केतन अरविंद भानुशाली उर्फ चंद्रा यांचे ताबेकब्जातील मिळकत आहे. सदर मिळकत ही श्री.मुकद्दर उमर आंबेडकर तर्फे कुलअखत्यारी श्री.उमर इशाक आंबेडकर, वय : ६४ वर्षे, धंदा : व्यवसाय, आधार नं.८८६३ ९२०३ ६३४२, रा.घर नं.ए-०२, गुरु विला, अतुलीत बलधाम रोड, टी.आर.पी., सह्याद्री नगर, नाचणे, मिरजोली, ता.जि.रत्नागिरी, महाराष्ट्र-४१५६३९ हे कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेत आहेत. वरील वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, भाडेपट्टा, लिज, तबदील, ट्रस्ट, गहाण कुळ वारस इ. कोणत्याही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापूसन १५ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांच्याकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकती निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे बंधानकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १४/०१/२०२२

सही/-
ॲड.जी.व्ही.मुकणे
शॉप नं.१२, सिल्वर अपार्टमेंट, रोनक झेरॉक्स खाली, विरुपाक्ष मंदिर जवळ,
शिवाजी रोड, पनवेल, जि.रायगड
मो.नं.९७६८८०६९५३

